॥ श्री बालाजी प्रसन्न ॥



पवन

फायबर्स अँड लॅमिनेशन डोअर्स

अॅल्युमिनियम & ग्लास विंडो

हार्डवेअर/लॅमिनेट/PVC /WPVC/डोअर लॅमिनेशन डोअर/सिमेंट चौकट

अनुडाईज्ड,3T Window , Black 3 Track Window , अॅल्युमिनियम डोअर, इलेव्हेशन टॉवर, पार्टीशियन इ. सर्व इंचिंग ग्लासचे कामे करून मिळतील.

प्रो. हंसराज कल्याणे पाटील (धोतरवाडीकर)

9921375851 / 7666347436

पत्ता : जळकोट रोड, ऑटे पेट्रोल पंपाच्या बाजूस, उदगीर.

दैनिक

अदिती एक्सप्रेस

Website: www.aditiexpress.in ईमेल-aditiexpress33@gmail.com संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

दैनिक ○ लातूर ○ वर्ष ३ रे ○ अंक ६३ ○ गुरुवार दि. १२ डिसेंबर २०२४ ○ किंमत २ रूपये ○ पृष्ठे ४

थोडक्यात वृत्त

पुणे मनपा शाळांमध्ये बसवणार सीसीटीव्ही

पुणे : गेल्या काही महिन्यांपासून शालेय मुलींवर अत्याचाराच्या घटना समोर येताना दिसत आहेत. त्यानुसार, आता सरकारनेही यावर कडक पावले उचलली आहेत. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. त्यानंतर आता पुणे महानगरपालिकेच्या शाळांमध्येही सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शाळांच्या परिसरात कचरा टाकणे, शाळेतील साहित्य चोरणे, मैदानात रात्रीच्या वेळी मद्यपी तसेच नशेखोरांचा वावर असणे, गुन्हेगारी कृत्य करणे असे गैरप्रकार रोखण्यासाठी महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून महापालिका आयुक्तांकडे मागणी करण्यात आली होती. या मागणीला स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून तीन कोटी रुपयांचा निधी देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे.

पुढील ७ दिवस राज्यभरात थंडीची लाट कायम

मुंबई : काही दिवसांपासून राज्यात हुडहुडी लागण्याची सुरुवात झाली असून बदलत्या वातावरणाचा नागरिकांना होणाऱ्या त्रासापासून दिलासा मिळण्यास सुरुवात झाली आहे. अशातच अवघ्या बारा तासांत राज्यातील बहुतांश भाग थंडीने गारठला आहे. तर ही थंडी आठवडाभर कायम अशीच राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. उत्तर भारतात पाकिस्तानातून पश्चिमी चक्रवात सक्रिय झाला असून, अवघा देश गारठण्यास सुरुवात झाली आहे. उत्तर भारतातून महाराष्ट्रात शीत लहरी वेगाने दाखल झाल्याने दोन दिवस आधीच राज्य गारठण्यास सुरुवात झाली. प्रामुख्याने जळगावचा पारा मंगळवारी राज्यात सर्वात कमी ८ अंशांच्या खाली आला. त्यापाठोपाठ नाशिक, अहिल्यानगर, पुणे शहरासह विदर्भातील नागपूर आणि परिसर गारठला आहे. थंडीची ही लाट १८ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. जळगाव ८, नाशिक ९.४, अहिल्यानगर ११.७, छ. संभाजीनगर १२.२, परभणी १२.५, महाबळेश्वर १३.२, अकोला ११.८, बुलढाणा ११.४, अमरावती १२.३, ब्रम्हपुरी १३.८, चंद्रपूर १२.५, गोंदिया १२.२, नागपूर १२, वाशिम १९.६, वर्धा १२.४, ट मुंबई (कुलाबा) २०.८, सांताक्रूझ १८, रत्नागिरी २१.१, कोल्हापूर १९.१, मालेगाव १६.८, सांगली १८.१, सातारा १५.८, सोलापूर १९.१, धाराशिव १६.३.

अवघ्या दोन तासांत घेता येणार विठुरायाचे दर्शन!

पंढरपूर : महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या विठुरायाचे दर्शन आता अवघ्या दोन तासात मिळणार आहे. यासाठी मंदिर समितीने बालाजी आणि वैष्णो देवीच्या धर्तीवर पंढरपुरात टोकण दर्शन व्यवस्था सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या माघवारीला प्रायोगिक तत्त्वावर टोकण दर्शन व्यवस्था सुरू करण्यात येणार आहे. पंढरीच्या सावळ्या विठुरायाच्या दर्शनासाठी आषाढी, कार्तिकी वारीला येत असतात. या वारीच्या व्यतिरिक्त वर्षभर भाविकांची पंढरीत अलोट गर्दी पाहण्यास मिळत असते.

भारत देश महान

नव्या दमाचा शूर हा बनला
विश्वाची शान जगी झळकतो
माझा भारत देश महान...
साधू संत धर्म पंत इथे
सारे पूजनीय संस्कृतीचा
तो पालक जपतो ग्रंथांची
खाण...
धर्म जाती-चाली रीती
नांदती एक समान विविधता
एकी सांगे सणांना वेगळा
मान...
इतिहास गातो इथे
महापुरुषांची गाथा जय
जवान किसान अमर हे
बलिदान...
पाईक आम्ही राष्ट्राचे आम्हा
त्यांचा अभिमान सैनिक
बनून सारे राखू तिरंग्याचा
मान...

– सुरेश पांडुरंग धोत्रे

माझी लाडकी बहीण योजनेतील

पुण्यातील १० हजार महिलांचे अर्ज बाद

पुणे- विधानसभा निवडणुकीनंतर लाडकी बहीण योजना रद्द होणार, अशा चर्चा निवडणुकीपूर्वी सुरू होत्या. त्यामुळे राज्यभरातील महिलावर्गात एकच खळबळ माजली होती. पण योजना बंद होणार नाही. असे त्यावेळचे उपमुख्यमंत्री आणि विद्यमान देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: सांगितलं होते. पण निवडणुकीनंतर राज्यात आता वेगळीच चर्चा सुरू झाली आहे. लाडकी बहीण योजनेतील प्रलंबित अर्जांची छाननी सुरू झाली असून त्यात आतापर्यंत १ हजार महिलांचे अर्ज अपात्र ठरले आहेत. निकषात न बसणारे अर्ज बाद करण्यात आले आल्याची माहिती आहे.



महायुती सरकारने पाच महिन्यांपूर्वी अंतरिम अर्थसंकल्पात लाडकी बहीण योजनेची घोषणा केली आणि जुलैपासून योजनेचे पैसे मिळणेही सुरू झाले. नोव्हेंबर महिन्यापर्यंतचे ७५०० रुपये जमा झाले. आता निवडणुकीनंतर जिल्हा प्रशासनाने प्रलंबित अर्जांची छाननी सुरू केली आहे. यात आतापर्यंत ९८१४ अर्ज निकषात न बसल्यामुळे अपात्र ठरल्याची माहिती आहे. आतापर्यंत पुणे जिल्ह्यातील २० लाख ८४ हजार ३६४ महिलांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. तर एकूण अर्जदारांपैकी ६९ हजार, १७५ अर्जदारांची आधार कार्ड बँक खात्याशी जोडले गेले आहे की नाही, याची तपासणी बाकी आहे.

महिला व बाल कल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जामसिंग गिरासे यांनी दिलेल्या माहिती नुसार, ५७२४ अर्जांमध्येही काही किरकोळ त्रुटी असल्याने ते तात्पुरते नाकारण्यात आले आहेत. पण त्यांना त्रुटी दूर करून पुन्हा अर्ज सादर करता येणार आहे. तर एकूण १२ हजार अर्जांची छाननी बाकी आहे. म्हणजेच ९९.४३ टक्के अर्जांची छाननी पूर्ण झाली आहे. या योजनेतील जिल्ह्यातील शिल्लक अर्ज मंजूर करण्याची प्रक्रियादेखील सुरू करण्यात आली आहे. सध्या दहा हजार अर्ज अपात्र ठरले आहेत. तर, लाडक्या बहिणींना पुढील हप्ता कधी मिळणार हे सरकारकडून जाहीर केले जाईल.

दरम्यान, लाडकी बहीण योजनेतंर्गत पिंपरी-चिंचवड शहरातील ४ लाख ३२ हजार, ८९० महिलांनी अर्ज भरला होता. त्यांपैकी ३ लाख ८९ हजार, ९२० महिला पात्र ठरल्या, त्यांना योजनेंतर्गत नोव्हेंबर पर्यंतचा लाभही मिळाला. तर ४२ हजार, ४८६ महिलांचे अर्ज बाद झाले आहेत. यात रहाटणी येथील ड क्षेत्रीय कार्यालय परिसरातील सर्वाधिक ६५८७१ **(पान २ वर)**

सीरियातून ७५ भारतीय

नागरिकांना सुरक्षित काढले बाहेर

दमास्कस : सीरियातील बशर अल असाद यांचे सरकार हयात तहरीर अल शाम संघटनेने उलथवून लावल्याने गोंधळ माजला आहे. सीरियातील सत्तेवर बंडखोरांनी ताबा मिळवला आहे. अनेक ठिकाणी हिंसक हल्ले होत आहेत. सरकारी इमारती जाळल्या जात आहेत. लूटमार केली जात आहे. अचानक झालेल्या या उलथापालथीमुळे अनेक परदेशी नागरिक सीरियात अडकले आहेत. यामध्ये भारताने सीरियातून ७५ भारतीय नागरिकांना बाहेर काढले. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सुरक्षा परिस्थितीची आढावा घेतल्यानंतर या ऑपरेशनचे समन्वय दमास्कस आणि बेरूतमधील भारतीय दूतावासांनी केले.



भारताने मंगळवारी (१० डिसेंबर) सीरियात अडकलेल्या ७५ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढले आहे. सीरियातून बाहेर काढण्यात आलेल्या भारतीयामध्ये जम्मू-काश्मीरमधील ४४ यात्रेकरूंचा समावेश आहे.हे सैय्यदा जैनब (सीरियातील शिया मुस्लिमांचे एक धार्मिक स्थळ) येथे अडकले होते. सर्व भारतीय नागरिकांना सीरियातून बाहेर काढल्यानंतर सुरक्षितपणे लेबनॉनला पोहोचले आहेत. त्यानंतर विमानातून त्यांना भारतात **(पान २ वर)**

नेपाळचे लष्करप्रमुख भारत दौऱ्यावर

अनेक महत्त्वाच्या बैठकींशिवाय अयोध्येला जाण्याचाही प्लॅन

नवी दिल्ली : नेपाळचे लष्करप्रमुख जनरल अशोक राज सिग्देल चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. येथे ते अनेक महत्त्वाच्या बैठकींमध्ये सहभागी होतील, त्यासोबतच द्विपक्षीय लष्करी सहकार्य वाढवणे आणि संरक्षण सहकार्यासाठी नवीन मार्ग शोधण्याचे त्यांचे लक्ष्य असेल. सभांव्यतिरिक्त सिग्देल अयोध्येत पोहोचतील आणि राम लल्लाचे दर्शन घेतील.



संरक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, ११ ते १४ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या भेटीचा उद्देश द्विपक्षीय लष्करी सहकार्य वाढवणे आणि संरक्षण सहकार्यासाठी नवीन मार्ग शोधणे हा आहे. आज जनरल सिग्देल नवी दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पहार अर्पण करतील. साऊथ ब्लॉक लॉनमध्ये त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात येणार आहे. यानंतर ते परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची भेट घेणार आहेत. संरक्षण मंत्रालयाच्या माहितीनुसार, जनरल सिग्देल यांना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून भारतीय संरक्षण उद्योगाची माहिती आणि आर्मी डिझाईन ब्युरोचे अतिरिक्त महासंचालक देखील देण्यात येणार आहेत.

नेपाळचे लष्करप्रमुख जनरल अशोक राज सिग्देल चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. त्यांचा हा अधिकृत दौरा आहे. जे भारत आणि नेपाळमधील संबंध मजबूत करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. या चार दिवसीय दौऱ्याचा उद्देश द्विपक्षीय लष्करी **(पान २ वर)**

पंतप्रधान पीक विमा योजनेत घोटाळा

१.७५ लाख शेतकरी ठरणार अपात्र

पुणे : महाराष्ट्रातील आठ जिल्ह्यांतील सुमारे १.७५ लाख शेतकऱ्यांनी पंतप्रधान पीक विमा योजनेंतर्गत त्यांच्या पात्रतेपेक्षा अधिक लाभ मिळविण्यासाठी चुकीचा डेटा सादर केल्याचा आरोप आहे. सोलापूर, पुणे, सातारा, अहिल्यानगर, धुळे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी चुकीची आकडेवारी दिली असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांना पीक विमा योजनेसाठी अपात्र ठरवण्याची मागणी राज्याच्या कृषी विभागाकडून करण्यात आली आहे. यामुळे ज्यांनी इतर प्रामाणिक शेतकऱ्यांचेही नुकसान होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या आठ जिल्ह्यांमध्ये सोलापूर अव्वल आहे आणि तेथील ३६ हजार ४३८ शेतकऱ्यांनी दिलेल्या आकडेवारीत तफावत आढळून आली आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या पिकांसाठी परवडणारे सर्वसमावेशक जोखीम कवच प्रदान करून शेतकऱ्यांना आधार देणे आहे, पंतप्रधान पीक विमा योजना २०१६ मध्ये सुरू करण्यात आली होती.



राज्याच्या कृषी विभागाच्या अहवालात असे म्हटले आहे की, आठ जिल्ह्यांमध्ये पाहणी करताना एकूण ८३ हजार ९११ शेतकऱ्यांनी कांदा पीक विम्याची विनंती केली होती, परंतु त्यांनी त्यांच्या शेतात कांदा पिकवला नाही, तर ६ हजार,२५८ शेतकऱ्यांनी त्यांच्या अर्जात त्यांच्याकडे असलेल्या वास्तविक जमिनीपेक्षा जास्त जमिनीवर कांदा पिकवल्याचे नमुद केले आहे. अहवालानुसार, चुकीची आकडेवारी देणाऱ्या आठ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची एकूण संख्या १ लाख ७४ हजार, ९७२ इतकी आहे.

पंतप्रधान पीक विमा योजनेंतर्गत पाऊस, दुष्काळ किंवा इतर नैसर्गिक आपत्तींमुळे एखाद्या शेतकऱ्याच्या पिकाचे नुकसान झाल्यास सरकार त्याला भरपाई देते. ही योजना शेतकऱ्यांना त्यांचे नुकसान भरून काढण्यास मदत करते, जेणेकरून ते आर्थिक संकटावर मात करू शकतील.

पात्रता अटी काय आहेत? **(पान २ वर)**

संविधान प्रतिकृतीची विटंबना! परभणीत आंबेडकर अनुयायांचा संताप

शेकडो वाहनांची तोडफोड, प्रशासन अलर्ट मोडवर

परभणी – शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. तेथे संविधानाची प्रत ठेवण्यात आली आहे. मंगळवारी (१० डिसेंबर) एक माथेफिरुने सायंकाळी ५.३० वा या संविधानाचे प्रतीची विटंबना केली. या घटनेच्या प्रतीची विटंबना झाल्यानंतर शहरातील आंबेडकरी अनुयायींनी संताप व्यक्त केला. याचदरम्यान पुकारण्यात आलेल्या बंद बंदला हिंसक वळण लागले. शहरात एका जमावाने ठिकठिकाणी मध्यवर्ती भागात वाहनांची तोडफोड आणि जाळपोळ करीत हिंसक आंदोलन केले. प्रचंड दगडफेक करत घरांचे आणि दुकानांचे नुकसान केले. येथे ठिकठिकाणी रास्ता रोको आणि चक्काजाम करत आंदोलकांनी धुडगूस घातला.



मंगळवारी सायंकाळच्या वेळेत रेल्वे रोको व रास्ता रोकोचे आवाहन केले. आणि आज पुन्हा आंबेडकरी अनुयायी रस्त्यावर उतरले आहे. यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासन अलर्ट मोडवर आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

परभणी बंद

या घटनेनंतर संतप्त अनुयायांनी उभ्या असलेल्या वाहनांवर दगडफेक केली. परभणी रेल्वे स्थानकावर मुंबईकडे जाणाऱ्या नंदीग्राम एक्स्प्रेससमोर घोषणाबाजी करून वाहन अडवले. दरम्यान, आज परभणी कडकडीत बंद पाळण्यात आला. बुधवारी सकाळपासूनच शहरातील अनेक भागात बंद पाळण्यात आला. बाजारपेठा, दुकाने, शाळा-महाविद्यालयात शुकशुकाट दिसला.

पोलिसांचा चोख बंदोबस्त

परभणी बंदच्या पार्श्वभूमीवर पोलीस **(पान २ वर)**

देशामध्ये महाराष्ट्रात सर्वाधिक वीज महाग : जयंत पाटील यांचा दावा

मुंबई - राज्यातील सध्याचे महावितरण कंपनीचे घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीजदर खूपच महाग आहेत. राज्यातील सरासरी देयक दर सध्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या मान्यतेप्रमाणे ८.९४ रुपये प्रति युनिट इतका म्हणजे देशात सर्वात जास्त आहे, असा आरोप महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेने अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी केलाय.





याचदरम्यान आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी महाराष्ट्रात इतर राज्यांपेक्षा महाग वीज असल्याचा दावा केला आहे. त्यांनी थेट आकडेवारीच मांडली आहे.सर्वात जास्त वीजदर म्हणजे प्रति युनिट ५.१६ ते १७.७९ रुपये महाराष्ट्रात मोजावे लागत आहेत.

सध्या लागू असलेल्या इंधन समायोजन आकारासह सरासरी बिल दर ९.६० रुपये प्रति युनिट या सार्वकालिक उच्चांकावर पोहोचला आहे, ज्याचे राज्यातील सर्व व्हिसा ग्राहकांसाठी गंभीर परिणाम आहेत. राज्यातील सर्व घरगुती आणि लहान व्यावसायिक ग्राहकांना जादा दराने त्रास होत आहे. गेल्या काही अशांत वर्षांमध्ये वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य कुटुंबांना खऱ्या अर्थाने तुटवडा निर्माण झाला आहे. पुरेशा नोकऱ्या उपलब्ध नाहीत. उद्योग आणि उत्पादन यांचा संबंध नाही. त्यामुळे सर्वसामान्यांना दैनंदिन गरजा भागवताना **(पान २ वर)**

पळवून नेलेल्या मुलीला शोधण्यात पोलिसांना यश



लातूर / प्रतिनिधी- अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने ऑपरेशन मुस्कान राबवून पळवून नेलेल्या एका अल्पवयीन मुलीचा शोध घेवून पुणे येथून तिला ताब्यात घेत पालकांच्या स्वाधिन करण्यात आले आहे.

मागील सहा महिन्यांपूर्वी १४ वर्षीय अल्पवयीन मुलीस अज्ञाताने पळवून नेल्याप्रकरणी औसा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होती. पोलिसांकडून पीडित मुलीचा शोध सुरू होता. औसा पोलीस व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडून समांतर तपास सुरू होता. दरम्यान, तांत्रिक माहिती संकलन करून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या टीमने सदर मुलीचा पुणे येथे शोध केला. अखेर सदर पथकाने पीडित मुलगी व तिच्यासोबतच्या आरोपीला ताब्यात घेतले. पीडित मुलगी व आरोपीस औसा पोलीस ठाण्यात हजर करून तिला पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात सदर कक्षाच्या पोलीस निरीक्षक बबिता वाकडकर, पोलीस निरीक्षक श्यामल देशमुख, पोलीस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी, पोलीस **(पान २ वर)**

अभिनव अध्यापक महाविद्यालयाच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते सत्कार

लातूर / प्रतिनिधी- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत घेण्यात आलेल्या उन्हाळी-२०२४ बी.एड. च्या परीक्षेमध्ये मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट लातूर द्वारा संचलित लातूर येथील अभिनव अध्यापक महाविद्यालयातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा सत्कार मांजरा ट्रस्टचे अध्यक्ष माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या हस्ते बुधवारी आशियाना निवासस्थानी नुकताच करण्यात आला.

यावेळी अभिनव अध्यापक महाविद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी सुबोध सर्वोत्तम गांदळे हे ९१.९२ टक्के गुणांसह विद्यापीठातून सर्वप्रथम तर संगीता भगवान पवार या ९१.३६ टक्के गुणांसह विद्यापीठातून सर्वद्वितीय तसेच महानंदा रामू पांचाळ यास ९०.६४ टक्के गुणांसह विद्यापीठातून सर्ववृतीय उत्तीर्ण झालेले असून महाविद्यालयाचा एकूण निकाल ९८.१६ टक्के इतका लागलेला असून गेली १५ वर्षापासून गुणवत्तेची परंपरा महाविद्यालयाने कायम ठेवून घवघवीत यशाचा आलेख कायम ठेवलेला आहे .



याप्रसंगी अभिनव अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर कुलकर्णी, प्रा. उमेश सुर्यवंशी, संगीता पवार, महानंदा पांचाळ व सुबोध मांदळे यावेळी उपस्थित होते यावेळी मांजरा ट्रस्टचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या .

महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा टिकवली मांजरा ट्रस्टचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली ही यशाची परंपरा कायम राहिली असून स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात अशी परंपरा टीकवणारे अभिनव अध्यापक महाविद्यालय पहिले आहे अशी माहिती मांजरा ट्रस्टचे प्रशासकीय अधिकारी डॉ अजय पाटील यांनी दिली

नाचता येईना, अंगण वाकडे

विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षाने सत्तेवर येण्याची स्वप्ने बघितली होती, महायुतीचे सरकार सत्तेवरून हटणार असे गृहीत धरूनच महाआघाडीचे नेते स्वप्नरंजनात दंग होते. निकालानंतर मुख्यमंत्री कोणाचा, या प्रश्नावर आघाडीच्या तीनही पक्षांत चर्चा चालू होती. माजी मुख्यमंत्री व उबाठा सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मुख्यमंत्री होण्याची महत्त्वाकांक्षा आहे हेही लपून राहिले नव्हते. निवडणूक काळात ते वारंवार काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरवा असा आग्रह करीत होते, कुणालाही मुख्यमंत्री ठरवा आपण लगेचच आपला पाठिंबा जाहीर करू, असे सांगण्याची घाई त्यांनी केली. शरद पवार असोत किंवा नाना पटोले, दोघेही ठाकरेंच्या हट्टापुढे नमले नाहीत. निकालानंतर आघाडीच्या सर्वच नेत्यांचे चेहरे पडले. विधानसभेत बहुमताची संख्या गाठू असे मुठी आवळून सांगणाऱ्या महाआघाडीच्या तीनही पक्षांना मिळून राज्यात पन्नास जागाही जिंकता आल्या नाहीत. दारुण पराभव झाल्यावर त्याची कारणे शोधण्याऐवजी विरोधी पक्षांनी मुठी आवळत पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडायला सुरुवात केली आहे.

पराभव झाला की सवयीप्रमाणे विरोधी पक्ष ईव्हीएमवर खडे फोडणार याचा अंदाज भाजपाला होताच, पण मीडिया व सर्वसामान्य जनतेला ते ठाऊक होते. म्हणूनच विरोधी पक्ष ईव्हीएमवर अविश्वास प्रकट करीत असला तरी जनतेने मात्र मतदानातून विरोधी पक्षावर अविश्वास नोंदवला आहे. निवडणूक काळात महाआघाडीच्या नेत्यांनी महायुतीच्या सरकारवर भरपूर तोंडसुख घेतले. पण लाडकी बहीण योजनेने सर्व विरोधकांची गोची करून टाकली. अखेर आम्ही सत्तेवर आल्यावर लाडक्या बहिणींना तीन हजार रुपये महिना देऊ असेही आमिष महाआघाडीने मतदारांना दाखवले. पण महायुतीच्या प्रामाणिकपणावर मतदारांनी अधिक विश्वास दाखवला व महाआघाडीचे आश्वासन म्हणजे लबाडा घरचे निमंत्रण हे मतदारांनी ओळखले. सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी गाव गेले आठवडाभर राजकारणात केंद्रस्थानी आले आहे.

ईव्हीएमविरोधात रान पेटवायला महाआघाडीच्या नेत्यांना मारकडवाडी ग्रामपंचायतीच्या ठरावामुळे एक कोलीतच मिळाले. ईव्हीएमला विरोध करणारे गाव अशी मारकडवाडीची प्रसिद्धी देशभर झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शप) चे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विजयसिंह मोहिते पाटील अशा ज्येष्ठांनी मारकडवाडीकडे कूच केल्याने या गावाचे व विषयाचे महत्त्व वाढले. मारकडवाडीचा विरोध म्हणजे सर्व राज्यातील गावांचा ईव्हीएमला विरोध असे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांनी चालवला आहे. अशा विरोधी मोहिमेमुळे आपण देशाच्या निवडणूक आयोगावर व निवडणूक यंत्रणेवर अविश्वास प्रकट करीत आहोत, याचे तारतम्यही नेत्यांना नसावे याचे मोठे आश्चर्य वाटते. पोस्टल मतदानात महाआघाडीच्या उमेदवाराला जास्त मते मिळाली, पण ईव्हीएमच्या मोजणीत कमी मते मिळाली असा दावा करणे किंवा तशी आकडेवारी पुरावा म्हणून देणे हे संयुक्तिक नाही.

पराभवानंतर ईव्हीएम विरोधात सुरू केलेली मोहीम ही देशातील जनतेची दिशाभूल करणारी आहे, याचेही भान आघाडीच्या नेत्यांना राहिलेले नाही. ईव्हीएमला महाराष्ट्रात महाआघाडी विरोध करीत आहे, तर उद्या देशपातळीवर काँग्रेसच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडी ईव्हीएम विरोधात मोहीम चालवणार आहे का? तसे झाले तर त्याचे काय परिणाम होतील याची कल्पना आघाडीच्या नेत्यांना आहे का? ईव्हीएमध्ये गैरप्रकार घडले किंवा ती यंत्रणा मॅनेज केली म्हणून महायुतीचे उमदेवार मोठी आघाडी घेऊन निवडून आले किंवा महाआघाडीचे उमेदवार मोठ्या मताधिक्यांना पराभूत झाले असे विरोधक भासवत आहेत. काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेस (शप)चे रोहित पवार किंवा उबाठा सेनेचे आदित्य ठाकरे निवडून आले तेही ईव्हीएममधील गैरप्रकारांनी का? विधानसभा निवडणुकीत दणदणीत पराभव झाल्यानंतरच विरोधकांनी ईव्हीएमविरोधात आक्रोश करायला सुरुवात केली आहे. जेव्हा विरोधी पक्षाला चांगले मताधिक्य मिळते व सत्ता काबीज करता येते तेव्हा ईव्हीएम चांगली असतात, पराभव झाली की ती वाईट कशी ठरतात? सर्वोच्च न्यायालयानेही याच मुद्द्यावरून याचिकाकर्त्यांना फटकारले आहे. दिल्लीत आम आदमी पक्षाने तीन वेळा सत्ता काबीज केली, अरविंद केजरीवाल तीन वेळा दिल्लीचे मुख्यमंत्री झाले. पण तिथे ईव्हीएमने आप ला निवडून दिले, असे कोणी म्हटले नाही.

कर्नाटकमध्ये भाजपाची सत्ता हटवून काँग्रेसची सत्ता मिळाली, सिद्धरामय्या मुख्यमंत्री व डीके शिवशंकर उपमुख्यमंत्री झाले, तिथे ईव्हीएमला भाजपाने दोष दिला नाही. झारखंडच्या विधानसभेत पुन्हा झारखंड मुक्ती मोर्चाची सत्ता आली व जेलमध्ये जाऊन आलेले हेमंत सोरेन पुन्हा मुख्यमंत्री झाले, तिथेही कोणी ईव्हीएमबद्दल अवाक्षर काढले नाही. मग महाराष्ट्रात मारकडवाडी गावाने मतपत्रिकांवर मतदान घेण्याचा ठराव केला म्हणून विरोधी पक्षांनी ईव्हीएम विरोधात आकांडतांडव का सुरू करावे? नव्याने निवडून आलेल्या विरोधी पक्षांच्या आमदारांनाही विधानसभेच्या विशेष अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी शपथ न घेता ईव्हीएम विरोधात निषेध करावा हे निकोप लोकशाहीचे लक्षण म्हणता येणार नाही. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदारांनी महाआघाडीचे ३१ खासदार निवडून दिले व महायुतीचे केवळ १७ जणांना विजयी केले. त्यातही भाजपाचे केवळ ९ खासदार निवडून आले. केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार असतानाही भाजपाचा लोकसभा निवडणुकीत राज्यात दारुण पराभव झाला, त्याचे खापर भाजपाने ईव्हीएमवर फोडले नाही. उलट निकालानंतरच्या सहा महिन्यांत झालेल्या चुका सुधारल्या, निकालाचे आत्मपरीक्षण केले. लोकसभा निवडणुकीत ईव्हीएम चांगले होते व विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ते एकदम वाईट कसे ठरले? मारकडवाडीचे नाव घेऊन ईव्हीएम विरोधात मोहीम चालवणे म्हणजे नाचता येईना, अंगण वाकडे, अशी विरोधी पक्षांची अवस्था आहे.

डॉ.शिवराज नाकाडे: विद्यार्थी केंद्रित शिक्षणव्यवस्थेचे आग्रही : प्रा.डॉ.अजय गव्हाणे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरचे माजी कुलगुरू डॉ. शिवराज नाकाडे यांचे दि.१ डिसेंबर रोजी दु:खद निधन झाल्याची वार्ता वाचून मन दु:खी झाले.

'साधी राहणी व उच्च विचारसरणी' या तत्त्वाची पाठराखण करून प्रत्यक्ष जीवनात त्याचा अंमल करणारे, उत्स्फूर्तपणे मनातील बोलणारे, चांगुलपणाच्या बाजूने सदैव भक्कमपणे उभे राहणारे एक शिक्षणतज्ञ, अभ्यासक, प्रशासक, विचारवंताने पृथ्वीचा निरोप घेतला. नैसर्गिक नियमानुसार प्रत्येकालाच मृत्यूचा सामना करावा लागणार; हे जरी मान्य केले तरी आपल्या अल्प आयुष्यातील पायवाट इतरांना मार्गदर्शकाप्रमाणे आकर्षित करेल; असे जीवन जगणे, यातच सार्थकता आहे. धर्म व अध्यात्म यामध्ये वारंवार हे सांगितले जात असले तरी त्याचा अंमल करणे साधी आणि सोपी गोष्ट नाही. डॉ. शिवराज नाकाडे या व्यक्तिमत्वाने मात्र आपल्या आयुष्यातील वाटचाल, विचार, कार्य व सहवासातून हे सार्थ केले आहे.

प्रस्तुत लेखकास १९९४- १९९५ या शैक्षणिक वर्षी कुलगुरू डॉ.शिवराज नाकाडे यांचा विद्यापीठात सहवास लाभला. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा: १९९४ नुसार विद्यार्थी संसदेचे वर्गप्रतिनिधी गुणवत्तेनुसार करण्याचा निर्णय घेतला आणि मी एम.ए.राज्यशास्त्र या द्वितीय वर्षी वर्गप्रतिनिधी झालो. १९९४ ते १९९९ हा डॉ.शिवराज नाकाडे यांचा विद्यापीठातील कुलगुरूपदाचा कालखंड. वर्गप्रतिनिधी झाल्यानंतर काही हितचिंतकांमुळे व विद्यापीठातील इतर मित्रांच्या आग्रहामुळे विद्यापीठ परिसराचा जनरल सेक्रेटरी पदावर देखील आरुढ झालो. सर्वात मोठा आनंद म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर झाल्यानंतरचा मी पहिला जी.एस. हे माझ्या आयुष्यातील सर्वात श्रेष्ठ, आनंददायी व अभिमानास्पद पद.

साहजिकच विद्यापीठाचा जनरल सेक्रेटरी झाल्यानंतर मा.कुलगुरुंसोबत बैठका, त्यांचे मार्गदर्शन, विविध उपक्रम, स्नेहसंमेलन, युवक महोत्सव हे ओघाने आलेच. विद्यापीठ परिसरातील वर्ग प्रतिनिधी व जनरल सेक्रेटरी यांच्या प्रथम बैठकीत कुलगुरू डॉ.शिवराज नाकाडे यांच्या मार्गदर्शनाने सर्वच प्रभावीत झाले. कोणतेही पद हे कार्य करण्यासाठी, पदाच्या अनुषंगाने सेवा करण्यासाठी असते. माणसाने सदैव सक्रिय राहून समाजोपयोगी विविध उपक्रम राबवले पाहिजे; या त्यांच्या संदेशाने बैठक मंत्रमुग्ध झाली. प्राप्त झालेल्या पदाबरोबरच एका उच्च दर्जाच्या प्रशासकासोबत, अंतरंगात माणुसकी असलेल्या शिक्षणतज्ञासोबत वावरावयास मिळेल; ही संधी आनंद द्विगुणीत करणारी होती. या ठिकाणी आमचे गुरु मार्गदर्शक ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणीचे सेवानिवृत्त राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.सुनील शिंदे यांचे वाक्य स्मरणात आले, माणसाने मूर्ख माणसावर हुकुमत गाजविण्याऐवजी शहाण्या माणसाच्या प्रत्येक शब्दाची, भावनेची जोपासना करावी.

वर्षभरातील डॉ.शिवराज नाकाडे यांच्यासमवेतच्या सहवासातील अनेक प्रसंग व नंतरच्या कालखंडातीलही आठवणी आज स्मृती म्हणून मनात तरंगत आहेत. त्यातील काही निवडक स्मृतींना स्मरण करून डॉ.शिवराज नाकाडे यांना शब्दरूपी श्रद्धांजली देण्याचा हा प्रयत्न.

विद्यार्थी संसदेच्या हेडखाली असलेला सर्व निधी जनरल सेक्रेटरी म्हणून त्याकाळी मी विद्यार्थ्यांच्या हितासाठी, शैक्षणिक गरजांसाठी माझ्या स्वाक्षरीनिशी खर्च केला. प्रत्येक उपक्रमासाठी निधी खर्च करताना डॉ. शिवराज नाकाडे आणि संबंधित पदाधिकारी माझ्यासमवेत चर्चा करीत, मार्गदर्शन करीत व विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून अंतिमत: माझा निर्णय मान्य करून उपक्रम राबविण्यासाठी परवानगी देत असत. दिव्यांग विद्यार्थ्यांना शेअर, स्टीक,



गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणविषयक आर्थिक मदत, स्नेहसंमेलन अशा उपक्रमांचा त्यात समावेश असे. नामांतरानंतर विद्यापीठात स्नेहसंमेलन झाले व आमचे मित्र स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील माध्यमशास्त्र संकुलाचे विद्यमान संचालक डॉ.राजेंद्र गोणारकर, मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव येथील इतिहासतज्ञ डॉ.देवेंद्र इंगळे, डॉ. विजय पाईकराव, डॉ.विनोद देशमुख, डॉ. अजित भांजी, संजय जाधव, डॉ. मिलिंद बुक्तरे, डॉ.सुरेश शेळके, दत्ता जगदाळे, विद्यमान चित्रपटतारका गीता अग्रवाल (शर्मा), डॉ.भास्कर गायकवाड, मुख्याध्यापक उपेंद्र दुधगावकर, प्रा.डॉ.संदीप व्ही. शिंदे यांच्या सहकार्याने महाराष्ट्रातील नामवंत कवी नारायण सुर्वे यांना स्नेहसंमेलनासाठी पाचारण करण्यात आले. कवी नारायण सुर्वे यांच्या क्रांतिकारी कवितांनी, विचारांनी स्नेहसंमेलन अविस्मरणीय ठरले. या स्नेहसंमेलनासाठी डॉ. शिवराज नाकाडे यांचे सहकार्य विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणीत करणार होता. स्नेहसंमेलनातील उपक्रमांनी सरांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत असल्याचे दिसून येत होते.

आणखीन एक उल्लेखनीय प्रसंग असा की, मा. कुलगुरू, विद्यार्थी प्रतिनिधी आणि प्राचार्यांच्या बैठकीत माझे मामा लॉ कॉलेज, बीडचे सेवानिवृत्त प्राचार्य रामराव शिंदे यांची उपस्थिती होती. या बैठकीत ते मला विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करताना पाहून आश्चर्यचकित आणि आनंदीत झाले. बैठक संपल्यानंतर त्यांनी कौतुकाने माझी पाठ थोपटली व डॉ.शिवराज नाकाडे यांच्यासारख्या कर्तृत्ववान कुलगुरूंच्या काळात जनरल सेक्रेटरी होणे आणि त्यांच्यासमोर मत ऐकण्याची व मांडण्याची संधी मिळणे, यासाठी भाग्य लागते. असे उदगार त्यांनी काढल्यामुळे आत्मसंतोष व आत्माभिमान या बाबींचा प्रत्यय आला.

डॉ.शिवराज नाकाडे हे कार्यक्रम छोटा असो की मोठा, विद्यार्थी संख्या कमी असो की जास्त; अशा अहंकारमय बाबींना जास्त महत्त्व देणारे नव्हते. छत्रपती शिवाजी महाराज विद्यार्थी वसतिगृह क्र.एक येथील विद्यार्थ्यांच्या गेट-टुगेदर व निरोप समारंभालाही येऊन विद्यार्थ्यांमध्ये सरमिसळ होत असत. कुलगुरू आणि विद्यार्थी असे अंतर त्यांनी आपल्या कार्यकाळात व नंतरही कधी ठेवले नाही. कोणतेही अंतर दरी, अढी निर्माण करते व सर्वांच्याच मनाची कवाड आपोआपच बंद करते; मात्र सरांचे आयुष्य आकाशात संचार करणाऱ्या मुक्त पक्षाप्रमाणे भासले. लपून-छपून याला काही सांगायचे, त्याला दुसरेच सांगायचे, विकासात स्पीडब्रेकर निर्माण करीत जायचे; अशा बाबी त्यांच्यापासून कोसो दूर होत्या. विद्यापीठ विद्यार्थी केंद्रित असावे, याचा केवळ भाषणातून उच्चार न करता व्यवहारात व प्रशासनात त्यांनी आणला. वर्गप्रतिनिधी आणि जनरल सेक्रेटरी म्हणून आम्ही वेटिंग रूममध्ये असताना बाहेर दिग्गजांची यादी व गर्दी असली तरी ते जनरल सेक्रेटरी व वर्ग प्रतिनिधींना अगोदर दालनात प्रवेश देत असत; तसेच पुरेसा वेळही देत असत. विद्यार्थ्यांसाठी त्यांच्याकडे घाई हा शब्द नव्हता.

समकाळात रसायनशास्त्र विभागात माझे दुसरे मामा डॉ.बी.आर. आरबाड कार्यरत होते. विद्यापीठाचे नियम, संकेत, सभागृह व बैठकीचे डेकोरम याविषयी त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळाले.

डॉ.शिवराज नाकाडे यांच्या शब्द व आवाजाला कर्तृत्वाची, प्रामाणिकतेची धार होती. मकर नाही त्याला डर कशालाफ या म्हणीचा प्रत्यय होता. स्वार्थ, अहंकार हे शब्द त्यांच्या आसपासही फिरकत नव्हते.

सर कुलगुरू म्हणून सेवानिवृत्त झाल्यानंतर काही महिन्यांनी रेल्वे प्रवासात भेट झाली. मी डॉ. सुनील शिंदे यांच्यासोबत प्रवास करीत होतो. मला पाहताच सरांनी, अजय कुठे जातोयस, ये बस इथे असे म्हणून आस्थेवाईकपणे चौकशी केली. छाती अभिमानाने फुलून आली. भेटीनंतर डॉ. सुनील शिंदे लगेचच मला म्हणाले, कुलगुरू पदावरील एवढ्या मोठ्या व्यक्तीने एका विद्यार्थ्याचे नाव लक्षात ठेवावे आणि आस्थेवाईकपणे जवळ बोलावून चौकशी करावी, हीच घटना माणसाच्या आयुष्यातील खरी संपत्ती आहे.

काही वर्षानंतर सरांची भेट दरभंगा (बिहार) येथे झाली. गांधी विचारांवरील राष्ट्रीय परिषदेत. तिथे देखील सरांचा सहवास, मार्गदर्शन, साधेपणा आणि सदोदित क्रियाशील राहण्याचा मंत्र पुन्हा मिळाला.

डॉ. शिवराज नाकाडे यांचे निधन म्हणजे एक शिक्षणप्रेमी, हाडाचे शिक्षक, उपक्रमशील प्राचार्य, व्यापक व उदार अंत:करणाचे कुलगुरू, सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानवतेवर प्रचंड श्रद्धा व विश्वास असणाऱ्या गुरूचा अस्त होय. आपण नेहमी एक वचन उद्गारतो, मरावे परी किर्ती रुपी उरावे, हे वचन डॉ. शिवराज नाकाडे यांना तंतोतंत लागू पडते. सरांची कीर्ती दूर आसमंतात सदैव दरवळत राहील.

सरांना भावपूर्ण श्रद्धांजली!

-डॉ.अजय गव्हाणे,
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
यशवंत महाविद्यालय,नांदेड

पान १ वरून

माझी...

महिलांचे अर्ज पात्र ठरले आहेत. तर पांजरपोळ आणि भोसरी येथील इ क्षेत्रीय कार्यालय भागातील ६३१०६ आणि थेरगाव येथील ६० ०३३ महिलांचे अर्ज पात्र ठरले आहेत.

सीरियातून ७५...

आणलं जाणार आहे.हयात तहरीर अल शामच्या बंडखोरांनी बशर अल असाद यांच्या सरकार हटवल्याच्या दोन दिवसांनी ही गोष्ट घडली आहे.

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने सांगितले की, भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेबद्दलचा संभाव्य धोका लक्षात घेऊन त्यांना देशातून बाहेर काढण्याचे काम दमास्कस आणि बैरूतमधील भारतीय उच्चायुक्तालयातून करण्यात आले. तसेच सरकार परदेशात भारतीय नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देते. परराष्ट्र मंत्रालयाने सीरियात राहणाऱ्या भारतीय नागरिकांना दमास्कसमधील भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहण्याचा सल्ला दिला आहे. सरकार परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवणार आहे.असं परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले आहे.

नेपाळचे...

सहकार्य वाढवणे आणि संरक्षण सहकार्यासाठी नवीन मार्ग शोधणे हा आहे. संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या दौऱ्यादरम्यान सिग्देल १४ डिसेंबरला अयोध्येला पोहोचतील आणि राम मंदिरात पूजा करतील. त्यांच्या भारत भेटीची संपूर्ण योजना कशी असेल ते जाणून घेऊया.

जनरल सिग्देल यांची भारत भेटीची योजना काय आहे?

१२ डिसेंबर रोजी जनरल सिग्देल राष्ट्रपती भवनात होणाऱ्या नियुक्ती समारंभाला उपस्थित राहणार आहेत. ज्यामध्ये भारतीय लष्कर आणि नेपाळी लष्कर यांच्यातील अनोख्या परंपरेनुसार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सिग्दाले यांना भारतीय लष्कराच्या मानद जनरल पदाने सन्मानित करतील. यासोबतच सिग्देल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचीही भेट घेणार आहेत.

दिल्लीतील नेपाळी दूतावासात नेपाळी लष्कराच्या सीओएसद्वारे परस्पर स्नेहभोजनाचे आयोजन केले जाईल. नंतर, जनरल अशोक राज सिग्देल माणेकशॉ सेंटर येथे एक रोपटे लावतील. सायंकाळी ते पुण्याला रवाना होतील. नेपाळचे लष्करप्रमुख १३ डिसेंबर रोजी पुण्यातील भारतीय संरक्षण उद्योगाला भेट देणार आहेत. येथे ते स्थिर उपकरणांचे प्रदर्शन पाहतील आणि प्रतिनिधींना भेटतील. येथून ते इंडियन मिलिटरी अकादमी, डेहराडून येथे जातील. जेथे ते सायंकाळी आढावा अधिकाऱ्यांच्या भोजनाला उपस्थित राहतील.

नेपाळी लष्कराचे सीओएएस जनरल अशोक राज सिग्देल १४ डिसेंबर रोजी जंटलमन कॅडेट्सच्या परेडमध्ये पुनरावलोकन अधिकारी म्हणून सलामी घेतील. ते व्हिजिटर बुकवर स्वाक्षरी करतील आणि नव्याने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांशी संवाद साधतील. ज्यामध्ये नेपाळी लष्कराच्या दोन सज्जन कॅडेट्सचाही समावेश आहे. १४ रोजी अयोध्येत रामललाचे दर्शन घेतल्यानंतर ते नेपाळला रवाना होतील.

पंतप्रधान...

योजनेचा लाभ फक्त भारतीय शेतकऱ्यांना दिला जातो.

ज्या शेतकऱ्यांच्या मालकीची जमीन आहे किंवा अनुसूचित क्षेत्रात भाड्याने शेती करतात ते पात्र आहेत.

या योजनेत मध्यमवर्गीय शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे, जेणेकरून अधिकाधिक शेतकऱ्यांना याचा लाभ घेता येईल.

अतिवृष्टीसारख्या प्रतिकूल हवामानामुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांचे संरक्षण करणे हा पीक विमा योजनेचा उद्देश आहे. या योजनेचा उद्देश आर्थिक नुकसानीच्या शक्यतेमुळे विमाधारक शेतकऱ्यांच्या अडचणी कमी करणे हा आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कृषी विभागाच्या एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले की, जिल्ह्यात काही ठिकाणी पाहणी केली असता पीक विमा योजनेचा लाभ घेताना शेतकऱ्यांकडून अनियमितता आढळून आली. रब्बी हंगामासाठी आम्हाला ८,९१० हेक्टर जमिनीवर फळपिकांचा विम्यासाठी १३,२८६ शेतकऱ्यांकडून अर्ज प्राप्त झाले आहेत.

ते म्हणाले, परंतु जागेच्या तपासणीत आम्हाला आढळून आले की १,०९८ शेतकऱ्यांच्या अर्जात ८०५.४८ हेक्टर जमिनीवर शेतकऱ्यांनी एकही फळ पीकही घेतल्याचे आढळून आले नाही. याशिवाय सुमारे २,५०० शेतकऱ्यांनी चुकीची आकडेवारी दर्शविली आहे. ४२८ हेक्टर जमिनीची मालकी आहे, परंतु प्रत्यक्षात जमीन त्यांच्या मालकीची नव्हती. कृषी विभागाच्या स्थानिक कार्यालयाने अशा शेतकऱ्यांची यादी कृषी आयुक्त कार्यालयाकडे पाठवून त्यांना पीक विमा योजनेतून अपात्र घोषित करण्याची मागणी केल्याचे या अधिकाऱ्याने सांगितले.

खरीप पीक विम्याची अडचण

खरीप हंगामात पेरलेल्या कांदा पिकातही या अनियमितता आढळून आली आहे. छत्रपती संभाजीनगरमधील कांदा पिकासाठी एकूण ११,७७० हेक्टर जमीन पीक विम्यामध्ये समाविष्ट करण्यात आली होती. परंतु तपासणीदरम्यान असे आढळून आले की, ३१५२.१८ हेक्टर जमिनीवर कांद्याची लागवड होत नसून, त्याचा विमा उतरवण्यात आला आहे. या शेतकऱ्यांची यादीही अपात्रतेसाठी पाठवण्यात आली आहे.

संविधान...

चौकीत बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परभणी शहरात आरसीपीच्या तीन तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील अनेक भागात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परभणी बाजारपेठ सकाळपासूनच बंद पाळण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ अनुयायी जमू लागले आहेत.

खानापूर फाटा परिसरात आंबेडकरी अनुयायांनी टायर जाळून रास्ता रोको करण्यास सुरुवात केली आहे. मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. परभणी–नांदेड वाहतूक पूर्णपणे बंद आहे. कालांतराने घडलेल्या घटनांचा सखोल तपास करणे आवश्यक आहे. आरोपीची नार्को टेस्ट करत घटनेच्या मागे सूत्रधार कोण आहे याचा शोध घेण्यात यावी, अशी मागणी रिपब्लिकन सेनेचे राज्य उपाध्यक्ष विजय वाकोडे यांनी केली आहे आरोपीविरोधात कडक कारवाई करण्यात यावी. तसे नाही झाले तर संपूर्ण राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी यावेळी दिला.

देशामध्ये...

अडचणी येत आहेत. सध्या लागू असलेल्या औद्योगिक व्हिसा दरामुळे राज्यातील अनेक छोट्या औद्योगिक घटकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक उद्योगांमध्ये वीज हा महत्त्वाचा कच्चा माल आहे. त्याचबरोबर राज्यातील अनेक उद्योग देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बाजारपेठेत टिकू शकणार नाहीत. महावितरण आणि राज्य सरकारने गांभीर्याने विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

वीज बिलात ३०% कपात करणार असे महायुती सरकारमधील लोकं मागच्या ४-५ महिन्यांपासून म्हणत आहेत. ३०% कपात सोडाच पण इतर राज्यांपेक्षा आपल्या महाराष्ट्रात सध्या वीज महाग मिळत आहे. राजस्थानमध्ये प्रति युनिटला ७.५५ ८.९५ रुपये मोजावे लागत आहेत, तर मध्य प्रदेशमध्ये ३.३४ ते ६.८० रुपये मोजावे लागत आहेत. शेजारच्या कर्नाटक राज्यात तर सरसकट प्रति युनिट ५.९० रुपये आहेत.

सर्वात जास्त वीजदर म्हणजे प्रति युनिट ५.१६ ते १७.७९ रुपये महाराष्ट्रात मोजावे लागत आहेत. वीज बिलात ३०% कपात करणार, पाच वर्षे शेतकऱ्यांना मोफत वीज देणार असे म्हणणारे आज प्रचंड बहुमताने सत्तेत बसले आहेत. सध्या राज्यात असलेले अवाढव्य वीजदर कमी करण्यात आता सरकारला कोणतीही अडचण नसावी! असं जयंत पाटील यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे.

पळवून...

अंमलदार सदानंद योगी, प्रकाश जाधव, महिला अंमलदार सुधामती यादव व लता गिरी, चालक निहाल मणियार यांनी ही सेवा बजावली.

'त्या' बेपत्ता मुलीचा मृतदेह आढळला

निलंगा / प्रतिनिधी- मागील आठवड्यात नदीच्या काठावर बॅग ठेवत, चप्पल सोडून गायब झालेल्या एका अल्पवयीन मुलीचा मृतदेह तेरणा नदी पात्रातील पाण्यावर तरंगताना निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी परिसरात मंगळवारी (दि.१०) आढळून आला.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी येथील एका महाविद्यालयात प्रथम वर्षात शिकत असलेल्या निकीता वाघोबा म्हेत्रे (वय १७) हिला मागील मंगळवारी (दि.३) सायंकाळी सात वाजेच्या सुमारास अज्ञाताने फूस लावून पळवून नेल्याची तक्रार वाघोबा म्हेत्रे यांनी शनिवारी (दि.७) औराद शहाजानी पोलीस ठाण्यात देण्यात दिली होती. त्यावरून हरवल्याची नोंद करून पोलीस तपास सुरू होता. दरम्यान, सदर मुलीची बॅग व चप्पल महाविद्यालयापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या तेरणा नदी पात्राशेजारी सोडल्याचे आढळून आले होते. पोलिसांनी घातपाताच्या दृष्टीने दोन दिवस मासेमारांमार्फत धरण क्षेत्रात शोध घेतला. मात्र, मुलगी आढळली नाही. मंगळवारी (दि.१०) सकाळी या मुलीचे प्रेत पाण्यावर तरंगताना आढळून आले. पोलिसांनी प्रेत ताब्यात घेऊन शवविच्छेदन केले. याप्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जनार्दन काळे हे करीत आहेत.

मानवी हक्क आदर्श जीवन

जगण्याची गुरुकिल्ली : डॉ. देशमुख

मुरूम (प्रतिनिधी) - व्यक्ती प्रतिष्ठेसाठी मानवी अधिकाऱ्याचा लढा कसा सुरू झाला व दुसऱ्या महायुद्धानंतर जगभर मानव अधिकाराविषयीची जाणीव निर्माण झालेली आहे ? तसेच आदर्श जीवन जगण्यासाठी या हक्काची आज गरज असून मानवी हक्क आदर्श जीवन जगण्याची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन डॉ अनिल देशमुख यांनी दि.१० डिसेंबर रोजी केले.

उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात एनसीसी विभागाच्यावतीने आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ गिरीधर सोमवंशी, उप्राचार्य डॉ विलास इंगळे, डॉ पद्माकर पिटले, लातूर येथील ५३ महाराष्ट्र बटालियनचे हवालदार राजेंद्र झाला, कोतकर, सोनटक्के, नायक सुनिल काळे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ देशमुख म्हणाले की, भारतीय संविधानाने मूलभूत अधिकाराच्या माध्यमातून भारतीयांना मानव हक्काचे हमी दिली आहे. आज भारतीय संविधानाने सर्वांना समानतेचा अधिकार, स्वातंत्र्य, शोषणापासून स्वरक्षणाचा, धार्मिक स्वातंत्र्य, अल्पसंख्यांक स्वरक्षण व घटनात्मक उपाय योजनेच्या अधिकारातून हक्काच्या स्वरक्षणाची हमी दिली आहे. याविषयी सर्वांनी जागरुक राहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयापासून बसस्थानकापर्यंत मानवी हक्का विषयी घोषणा देत ही रॅली शहरात काढण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी तर उपस्थितांचे आभार कॅडेट ओमकार वाघमोडे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व कॅडेटस मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE Title-Code:-MAHMAR51927

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादक: गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३

भरधाव ट्रकने शालेय विद्यार्थ्याचा घेतला बळी



धाराशिव (प्रतिनिधी) - शहरातून गेलेल्या सोलापूर छत्रपती संभाजीनगर या राष्ट्रीय महामार्गावर एका भरधाव ट्रकने १२ वर्षीय शालेय विद्यार्थ्याला जोराची धडक दिल्याने विद्यार्थी पंचवीस फूट अंतरावर जाऊन त्याचा जाग्यावरच तरफडून मृत्यू झाल्याची हृदय पिळवटून टाकणारी व मन हे लावून सोडणारी अत्यंत दुर्दैवी घटना दि.१० डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास पोद्दार शाळेच्या पूर्वेकडील बाजूस घडली आहे. दरम्यान, या महामार्गाच्या सर्विस रोडचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. सध्या सुरू असलेले काम देखील अत्यंत संत गतीने संबंधित ठेकेदार करीत असल्यामुळे हा अपघात केवळ ठेकेदाराच्या दिरंगाई व निष्काळजीपणामुळेच झाला असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. दरम्यान, क्लिनर जखमी झाला असून त्याचा पाय निकामी झाला आहे. धाराशिव शहरातून गेलेल्या सोलापूर - छत्रपती संभाजीनगर या राष्ट्रीय महामार्गाच्या सर्विस रोडचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. सर्विस रोड नसल्यामुळे साईड पट्टीवरून घराकडे निघालेल्या ६ वी मध्ये शिकत असलेल्या अर्णव अजय सोनवणे (१२) या शालेय विद्यार्थ्याला ओव्हरटेक करण्याच्या नादात भरधाव व सुसाट वेगात असलेल्या ट्रक क्रमांक (केए- १३ बी - १७७३) ने जोराची धडक दिली. धडक इतकी भयानक होती की, त्या विद्यार्थ्याच्या सायकलचा जाग्यावरच चुराडा झाला. तर सायकलवरील विद्यार्थी पाठीवरील दप्तरासह जवळपास २० फूट अंतरावर जाऊन एकदम जोरात सर्विस रस्त्याच्या खड्ड्यात आदळला व आदळलेल्या जागीच त्याचा तरफडून अत्यंत दुर्दैवी मृत्यू झाला. तर ट्रक त्याच सर्विस रस्त्याच्या खड्ड्याच्या नालीत पलटी झाला. ज्या ठिकाणी धडक बसली त्या ठिकाणी रस्त्यावर रक्ताचा सडा पडला होता. तसेच त्या विद्यार्थ्याच्या पायातील बूट व इतर साहित्य देखील विखुरलेले होते. जर सर्विस रोड वेळेत तयार केला असता तर हा विद्यार्थी त्या सर्विस रोडने शाळेला व शाळेतून घराकडे गेला असता. तसेच, हे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले असून गेल्या ६ महिन्यांपासून हे काम सुरू केली आहे. मात्र, हे काम अत्यंत संथ गतीने करण्यात येत आहे. विशेष म्हणजे ते काम देखील अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून टेंडरमध्ये असलेल्या निकषांप्रमाणे होत नसल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

राष्ट्रीय महामार्ग बनला मृत्यूचा सापळा !

राष्ट्रीय महामार्ग धाराशिव शहरातून तेरणा इंजिनिअरिंग महाविद्यालय ते एमआयडीसी, सर्किट हाऊस या दरम्यान आहे. या रस्त्याच्या दुतर्फा सर्विस रोड मंजूर केलेला आहे. ती जागा देखील खुली करण्यात आलेली आहे. मात्र अद्यापपर्यंत या सर्विस रोडचे काम केलेले नाही. या कामाचे उद्घाटन राजकीय मंडळींनी अगदी थाटात केले. मात्र उद्घाटन केलेल्या कामाचे पुढे काय झाले ? याकडे त्यांनी ढुंकून देखील बघितलेले दिसत नाही. लोकप्रतिनिधींचा अधिकारी व ठेकेदारावर जो असावा लागतो तो धाक संपल्यामुळेच ते काम अतिशय संथपणे केले जात आहे. त्याबरोबरच शहरवासियांना ये-जा करण्यासाठी दुसरा पर्यायी रास्ता नाही. त्यामुळे त्यांना नाईलाज असतो या रस्त्यावरूनच यावे जावे लागते. त्यातूनच हे असे दुर्दैवी अपघात होऊन अनेकांना आपले जीव गमवावे लागले आहेत. त्यामुळे हा रस्ता मृत्यूचा सापळा बनला व बनत चालला आहे.

निकृष्ट कामाचा उत्तम नमुना, अधिकाऱ्यांची डोळेझाक !

विशेष म्हणजे या साईड पट्ट्याच्या खड्ड्यामध्ये डबर, मुरुम व खडी भरणे हे बंधनकारक आहे. मात्र ठेकेदार त्यामध्ये चक्क मातीचे ढीम रिचऊन तो खड्डा भरीत आहे. त्याबरोबरच रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या नाली उंचवट्यावर करण्यासाठी त्या नालीच्या खाली देखील चक्क मातीचा भराव चढविलेला आहे. तसेच या नालीसाठी रेती, सळई व सिमेंट ज्या प्रमाणात वापरणे आवश्यक असते. त्या प्रमाणात साहित्य वापरले जात नसून लोखंडी सळई तर नावाला देखील वापरल्याचे दिसत नाही. मात्र या रस्त्याच्या देखरेखीसाठी नियुक्त केलेले व जबाबदारी दिलेले अभियंते नेमकी कशाची तपासणी करतात ? हा प्रश्न निर्माण झाला आहे. दर्जेदार काम होण्याऐवजी अतिशय निकृष्ट काम या सर्विस रस्त्याचे होत असल्यामुळे पुढे काम आणि मागे सपाट अशी अवस्था या रस्त्याच्या कामाची दिसून येत आहे

विभागातील सर्व जिल्ह्यांनी ध्वजदिन निधी संकलन इष्टांक पूर्ण करावा- दिलीप गावडे

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनीधी): देशाच्या सिमांचे रक्षण करण्याचे कर्तव्य बजावतांना प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांप्रती संपूर्ण देश नतमस्तक व कृतज्ञ आहे. अशा सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी उभारल्या जाणाऱ्या ध्वजदिन निधीत योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विभागातील सर्व जिल्ह्यांनी आपापल्या जिल्ह्यात ध्वजदिन निधी संकलनासाठी दिला जाणारा इष्टांक पूर्ण करावा,असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिले.

जिल्हा प्रशासन येत्या सन २०२५ पासून दर महिन्यातील एक दिवस सैनिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार असून या दिवशी सैनिकांचे, माजी सैनिकांचे,त्यांच्या अवलंबितांची कामे विशेषत्वाने मार्गी लावण्यात येतील,असा संकल्प जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ध्वजदिन निधी संकलन प्रारंभा प्रसंगी व्यक्त केला.

जिल्ह्यातील ध्वजदिन निधी संकलनाचा प्रारंभ आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते करण्यात आला. मौलाना आझाद संशोधन केंद्र येथील सभागृहात



आज हा समारंभ पार पडला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर(निवृत्त) सय्यदा फिरासत, मेजर सुभाष साळवे, विंग कमांडर जाधव, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क क्षीरसागर तसेच माजी सैनिक, त्यांचे कुटुंबीय, वीरमाता, वीर पत्नी, वीर पिता आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते शहिद स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्व वीरमाता, वीर पत्नी, वीर पिता यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात कामगिरी बजावणारे माजी सैनिक, त्यांचे पाल्य यांनाही गौरविण्यात आले.

आपल्या संबोधनात पोलीस अधीक्षक राठोड म्हणाले की, कोणत्याही देशाच्या प्रगतीमागे देशाच्या सीमा सुरक्षित असणे हे सगळ्यात महत्त्वाचे कारण असते. त्यासाठी योगदान देणारे सैनिक हे आपल्या देशाच्या प्रगतीला कारणीभूत असतात. त्यासाठी ते प्रसंगी प्राणाचे बलिदान देतात. त्यामुळे त्यांच्याप्रती कृतज्ञ असणे हे आपल्या सगळ्यांचे कर्तव्य आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, जिल्ह्याला ध्वजदिन निधी संकलनासाठी १ कोटी २० लक्ष रुपये इतके उद्दिष्ट असले तरी जिल्हा १ कोटी ५० लक्ष इतके निधी संकलन करुन राज्यात प्रथम क्रमांक मिळवेल. या निधी संकलनात सगळ्यांनी आपला वाटा उचलावा. याशिवाय जिल्हा प्रशासन प्रशासकीय कामकाजात दर महिन्याला एक दिवस सैनिकांसाठी हा उपक्रम राबवुन सैनिकांचे त्यांच्या कुटुंबियांचे प्रशासनाच्यास्तरावरची कामे पूर्ण करेल.

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सांगितले की, विभागातील सर्व जिल्ह्यांनी आपापल्या जिल्ह्यात दिलेले ध्वजदिन निधी संकलनाचे इष्टांक प्राधान्याने पूर्ण करुन संपूर्ण विभाग ध्वजदिन निधी संकलनात अव्वल ठेवावा,असे निर्देश त्यांनी दिले. तसेच ध्वजदिन निधीत सढळ हाताने आपले योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ते प्रत्येक नागरिकाने द्यावे,असे आवाहनही त्यांनी केले.

प्रास्ताविक मेजर(निवृत्त) सय्यदा फिरासत यांनी केले. सूत्रसंचालन गौतमी आव्हाड यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

धनादेश न वाटल्या प्रकरणी ऊसतोड मुकादमास पावणे चार लाखाचा दंड व कारावासाची सजा

धाराशिव (प्रतिनिधी) - तालुक्यातील केशेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्यास ऊस तोड मुकादमाने दिलेला चेक न वटल्या दाखल खटल्यात ऊसतोड मुकादमास ३ लाख ८१ हजार ३९३ रुपयांचा दंड व कारावास अशी दुहेरी शिक्षा प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी साठे यांनी ठोठावली आहे.

धाराशिव तालुक्यातील केशेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याकडून ऊस तोड मुकादम अशोक सौदागर वीर याने २ लाख २५ हजार रुपये उचल घेतली. मात्र करारानुसार काम केले नाही. कारखान्याने उचल घेतलेल्या रक्कमेची मागणी केली असता कारखान्याच्या हक्कात २ लाख ८१ हजार ३९३ रुपयांचा चेक दिला. मात्र खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नसल्यामुळे चेक वठला नसल्यामुळे साखर कारखान्याने धाराशिव येथील न्यायालयात कलम १३८ नि.ई. ऍक्टनुसार तक्रार दाखल केली. या खटल्याची सुनावणी धाराशिव प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साठे यांच्या न्यायालयात झाली. या प्रकरणामध्ये फिर्यादी कारखान्याच्यावतीने दिलेला साक्ष पुरावा, खाते उताऱ्यातील नोंदी, कारखान्याच्या हक्कातील करारनामा या बाबी विचारात घेता आरोपी वीर हा फिर्यादी कारखान्याचे कायदेशीर देणे लागत असल्याबाबतचा फिर्यादीचे वकील ॲड. सुधाकर व्ही. तांबे यांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन न्यायालयाने आरोपी ऊस तोड मुकादम वीर यास २ महिने कारावास व ३ लाख ८१ हजार ३९३ रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. त्या प्रकरणी फिर्यादीचे वकील ॲड. सुधाकर व्ही. तांबे यांना ॲड. चांद के. अत्तार, ॲड. संकेत एस. तांबे यांनी सहकार्य केले.

श्री क्षेत्र मेडसिंगामध्ये अवतरली सोन्याची जेजुरी



धाराशिव (प्रतिनिधी) - तालुक्यातील मेडसिंगा येथे खंडोबा मंदिरात यात्रेनिमित् विविध कार्यक्रम आयोजित केले होते. खंडोबा मंदिर येथे घेण्यात आलेल्या भजन कीर्तन,आराधी मंडळ, धनगराची ओवी, भारुडाचा कार्यक्रम, कालचा वाघ्या मुरळीचा कार्यक्रम, सर्व रस्त्यांनी व आपापल्या दारामध्ये सडा रांगोळी काढण्यात आली होती.

सुशोभीकरण केले व शेवटच्या दिवसी गाव भंडारा व अन्नदान करणारे व्यक्ती सिद्धेश्वर तुकाराम शित्रे यांनी संपूर्ण गावाला अन्नदान केले व २१ गावचे वारवाले मंडळी येऊन खंडोबाच्या काटीची बैलगाडीतून खंडोबा व म्हाळसा मिरवणूक व पालखी मिरवणूक संपूर्ण गावातून काढून सांगता करण्यात आली. त्यामुळे सोन्याची जेजुरी अवतरल्यासारखे भक्तिमय वातावरणामध्ये निर्माण झाले होते. येळकोट, येळकोट जय मल्हार, सदानंदाचा येळकोटचा गजर करण्यात आला. यावेळी मुख्य वाघे विठ्ठल शित्रे, हरी शित्रे, कल्याण शित्रे, अविनाश शित्रे, नाना खिल्लारे, शशिकांत मुंडे, प्रकाश गोरे, अक्षय भोरे, गिरीश भोजंगुडे, तानाजी रोहिले, वाघा शित्रे, समाधान आगळे, बालाजी शित्रे, आबा शिंदे, रामभाऊ चौधरी, नेताजी खापरे, दादा साठे, अविनाश जाधव, पप्पू शित्रे, विश्वास शित्रे, शिवहरी शित्रे, बाळू शित्रे आदींसह अनेक गावातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या कामाला लागावे :मोरे



उमरगा (प्रतिनिधी) - राज्यात विधानसभा निवडणुकीत केवळ ईव्हीएम घोटाळ्यामुळे महाविकास आघाडीला अपयश आले आहे. मात्र महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी खचून न जाता आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर पालिका निवडणुकीसाठी सतर्क रहावे व या निवडणुकीच्या कामाला लागावे असे आवाहन जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष आश्लेष मोरे यांनी दि.१० डिसेंबर रोजी केले.

दरम्यान, सोनिया गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त अनाथ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करुन गांधी यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीचा निकाल जनतेसाठी संशयास्पद असून यासाठी अशा निवडणुका बॅलेट पेपरवर घ्यावेत अशी मागणी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली आहे. त्यामुळे काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नईथला यांच्या आदेशानुसार व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या निर्देशानुसार व मराठवाड्यातील काँग्रेसचे नेते माजी मंत्री अमित देशमुख व जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष धीरज पाटील यांच्या सूचनेनुसार शहरातील काँग्रेस कमिटी कार्यालयात ईव्हीएम हटाओ, देश बचाओ निमित्त स्वाक्षरी मोहिम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात अशी मागणी यावेळी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र शेरखाने, विजयकुमार सोनवणे, नानाराव भोसले, तालुकाध्यक्ष अर्जुन बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना मोरे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले होते. मात्र तीनचार महिन्यातच असा काय चमत्कार झाला ? हे जनतेला समजत नाही. निवडणुकीत जय पराजय हा होतच असतो. त्यामुळे कार्यकर्त्यांनी निराश होता कामा नये. लवकरच जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर पालिका निवडणूक होणार आहेत.

त्यामुळे सर्वांनी एक निष्ठेने काम करणे काळाची गरज आहे. पक्षाने माझ्यावर ही जबाबदारी दिली असून सर्वांना सोबत घेऊन तालुक्यात काँग्रेस पक्षाच्या बळकटी करणासाठी प्रयत्न करीन असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी राजेंद्र शेरखाने, विजयकुमार सोनवणे,ॲड दिलीप सागर आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी एम.ओ. पाटील, विजय वाघमारे, ऍड दिलीप सगर, विजय दळगडे, अभिषेक औरादे, सतीश जाधव, नीलकंठ कोटरगे, ॲड अशोक पोद्दार, ॲड. शुभदा पोद्दार, ऍड. एस.पी. इनामदार, मधुकर बिद्री, मच्छिंद्र सरपे, दादासाहेब गायकवाड, बाबा मस्के, जीवन सरपे, राहुल वाघ, मधुकर यादव, विशाल काणेकर, प्रकाश चव्हाण, विराज मोरे, नितीन कोराळे, योगेश मुगळे, बाबा बिराजदार, याकुब लदाफ, अमित रेड्डी आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खामसवाडी येथील विद्यार्थ्यांना हाप पॅन्ट ऐवेजी फुल पॅन्ट वाटप करावी

कळंब (प्रतिनिधी) - तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्रशालेत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्या वतीने सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात स्काऊट व गाईड विषयास अनुरुप गणवेश वितरण करण्यात आले आहेत.

केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अंतर्गत गणवेश योजनेचा लाभ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या इयत्ता१ली ते ८ वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसूचित जाती मुले, अनुसूचित जमाती मुले, तसेच दारिद्र रेषेखालील पालकांची मुले यांना प्रत्येकी दोन गणवेश यांचा लाभ देण्यात येतो. त्यामुळे खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्रशालेत ही विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले आहे.परंतु इयत्ता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना फुल पॅन्ट ऐवेजी हाप पॅन्ट दिली असल्यामुळे सदरील विद्यार्थ्यांना पॅन्ट घालन्यास अडचणी होत आहेत. काही विद्यार्थी हे वयाने जरी लहान असले तरी शरीराने मोठे झालेले आहेत त्यामुळे सदरील विद्यार्थ्यांना हाप पॅन्ट घातल्याने अगदी ओशाळल्या सारखे वाटत आहे. तर सद्यस्थितीत थंडीचे दिवस असल्याने त्यांना अर्धवट पॅन्ट घातल्याने थंडी वाजण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे इयत्ता ५वी ते ७ वी च्या खामसवाडी येथील एकुण १०५ विद्यार्थ्यांना हाप पॅन्ट ऐवेजी फुल पॅन्ट द्यावी अशी मागणी शालेय शिक्षण कमिटीचे अध्यक्ष राम शेळके यांनी शाळेचे मुख्याध्यापक व कळंब येथील गट शिक्षणाधिकारी कार्यालय यांना विनंती अर्जाद्वारे मागणी केली आहे. सदरील अर्जावर राम शेळके यांची स्वाक्षरी आहे.

निराधार योजनेचा लाभ लाभार्थ्यांना देण्याची जाणिव संघटनेची मागणी



कळंब (प्रतिनिधी) - वाशी तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना व गायरान अतिक्रमितधारक शेतकऱ्यांच्या नावे गायरान पट्टे करावेत अशी मागणी जाणीव संघटनेच्यावतीने एका निवेदनाद्वारे उपविभागीय अधिकाऱ्यांकडे केले आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, वाशी तालुक्यातील संजय गांधी निराधार, श्रावण बाळ सेवा योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ काळ योजना, यांच्या पेन्शन वाटपामध्ये २०२२ पासून तफावत आहे. सातत्याने सर्वांनी श्रावणबाळ सेवा योजनेचे अर्ज भरून कोणाला तेराशे , पंधराशे, हजार रुपये पेन्शन देऊन पिळवणूक केली जाते आहे. केंद्र सरकारचा वाटा आला नाही असे सांगितले जाते. आला तरी अनेक लाभधारकांना दिला जात नाही, याची सखोल चौकशी होऊन सर्वांना समान पेन्शन वाटप करण्यात यावी. वाशी तालुक्यातील १९८५ पासून अठरा गावातून भूमिहीन दलित आदिवासी यांनी शासकीय पड गायरान जमिनीवर अतिक्रमण करून पिके काढून आपला उदरनिर्वाह भागवत आहेत. सातत्याने निवेदने, धरणे, आंदोलने करून देखील कसलीही कारवाई होत नाही. यासाठी मा. जिल्हाधिकारी धाराशिव, मा. मुख्यमंत्री मंत्रालय मुंबई, व तहसील कार्यालय वाशी यांच्याकडे पुरावे दाखल केलेले आहेत. त्यामुळे वस्तूस्थितीची पाहणी करून अतिक्रमित गायरान धारकांच्या नावे सातबारा देण्यात यावा. एकल महिला, विधवा, परीतक्त्या, आर्थिक दुर्बल, गोरगरीब यांना २१ हजार वार्षिक उत्पन्नाचे ऐवजी ५१ हजार रुपयाची आट लागू करा. व सर्वांना संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ सेवा योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना, एकल महिला विधवा, परीतक्त्या यांना पेन्शन लागू करावी. वाशी तालुक्यातील मागासवर्गीय,आदिवासी यांना गावोगावी स्मशानभूमी देण्यात यावी व असलेली स्मशानभूमी नावावर करून ताबा देण्यात यावा, विभक्त कुटुंबांना शिधापत्रिकेची फोड करून नवीन शिधापत्रिका वाटप करण्यात यावी व सर्वांना रेशनचा लाभ देण्यात यावा आदी करण्यात आल्या आहेत. या निवेदनावर जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे, श्रावण क्षीरसागर यांच्या सह्या आहेत.

जमिनीत जैविक सूक्ष्म जीवाचा अधिवास वाढवण्याची गरज : जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कळसाईत

जागतिक मृदा दिन पोखर्णी येथे संपन्न

नांदेड(प्रतिनीधी) : जमिनीतील रासायनिक खतांचा होणारा अतिवापर टाळून जमिनीमध्ये जैविक सूक्ष्म जीवाचा अधिवास वाढणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी डी. आर. कळसाईत यांनी केले.

जागतिक मृदा दिनानिमित्त जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी कार्यालय व कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी येथे मृदा दिन कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच ५ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी डी. आर. कळसाईत तर प्रमुख मार्गदशक म्हणून तालुका कृषी अधिकारी चातरमल, कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. देविकांत देशमुख, डॉ. महेश अंभोरे, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी प्रकाश पल्लेवाड यांची उपस्थिती होती.

जैविक संघ ट्रायकोडर्मा, मेटझराझियम, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क आदी सूक्ष्म जीव व जैविक घटकांचा वापर करावा असे सांगितले. जमिनीचे आरोग्य अबाधित राहण्यासाठी एकात्मीक अन्न द्रव्य व्यवस्थापन, मिश्र पीक पद्धती विषयी माहिती दिली. शेतकऱ्यांनी जमिनीशी असलेली आपली नाळ घट्ट करावी असे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी डी. आर. कळसाईत यांनी सांगितले.

डॉ. देविकांत देशमुख यांनी शेतकऱ्यांना आपल्या प्रमुख मार्गदर्शनातुन मृदेचे मानवाच्या जीवनातील अनन्य साधारण महत्त्व विशद करुन शेतकऱ्यांनी रासायनिक खते व औषधे यांचा वापर कमी करून सेंद्रिय खतांचा वापर करावा. मृदेचे आरोग्य व जैवविविधता जोपासावे असे सांगितले. कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी येथील शास्त्रज्ञ प्रा. संदीप जायभाये यांनी शेतकऱ्यांनी मृदा परीक्षण अहवालाप्रमाणे पिकांना खतांच्या मात्रा द्याव्यात तसेच मृदेचा सामु, सेंद्रिय कर्ब यांची माहिती सोप्या भाषेत सांगितली. तसेच मृदा चाचणीतुन शेतीमध्ये सकारात्मक बदल होत असल्याचे मत व्यक्त केले. प्रा. पवळे मॅडम यांनी मृदेचे आरोग्य चांगले राहण्यासाठी मृद परीक्षण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले व त्याचे महत्त्व सांगितले.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कळसाईत यांच्या हस्ते गावातील शेतकऱ्यांना जमीन आरोग्य पत्रिकेचे वाटप करण्यात आले. तसेच कृषि विज्ञान केंद्र येथील प्रशिक्षित घेतलेल्या प्रशिक्षणार्थी यांचा प्रमाणपत्र सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. महेश अंभोरे यांनी केले तर जि.मृ.स.मृ चा अधिकारी पी. पी. पल्लेवाड यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी प्रकाश पल्लेवाड कार्यालयातील कृषी पर्यवेक्षीका जे.सी. शिंदे, कृषि सहाय्यक एस.एस. सोनवणे, गुप्ता मॅडम, दत्तत्रय चिंतावार, गजानन पडलवार, राहुल जाधव, जावेद शेख, मोहन बेरजे, सुनील कराळे, एम.ए. पठाण आदींनी परिश्रम घेतले.

देशी गोवंश संवर्धन पशुपालकांसाठी वरदान : डॉ.बाबासाहेब ठोंबरे



लातूर : जो अहोरात्र जगाचे पोट भरण्यासाठी राबतो, मेहनत करतो त्या बळीराजासोबत हितगुज करून त्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेवून त्या सोडविण्यासाठी आज कृषि महाविद्यालय व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाची संकल्पना ही वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ.इंद्र मणी यांची असुन या कार्यक्रमास कृषि महाविद्यालय व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूरचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे शेतकऱ्यांसोबत हितगुज करताना म्हणाले की, देशी गोवंश पालनातून पशुपालकांनी आत्मनिर्भर व्हावे. राज्यमाता गोमाता संवर्धन शेतकरी व पशुपालकांसाठी वरदान होय. पशुंसाठी मुक्तसंचार गोठा पद्धत ही फायदेशीर असून त्यांचे वेळोवेळी लसीकरण करून घ्यावे. सध्या हवामान बदलामुळे चारा व पाणीटंचाईची समस्या जाणवत असून, कमी तापमानामुळे दुध उत्पादनात २० ते २५ % घट होवून त्याचा दुधाच्या गुणवत्तेवर सुद्धा परिणाम होतो म्हणून पशुपालकांनी हवामान बदलानुसार पीकपद्धतीचा व पशु संगोपनाचा अवलंब करावा असेही ते म्हणाले. डॉ. विजय भामरे आपल्या मार्गदर्शनात तुर व हरबरा पिकावरील महत्वाच्या किडी उदा. शेंगा पोखरणारी आळी, पिसारी माशी, घाटे आळी, इत्यादीबद्दल माहिती व एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे उपाय सांगून त्याबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली. डॉ. अच्युत भरोसे यांनी यावेळी जैव तंत्रज्ञान काळाची गरज या विषयाबाबत मार्गदर्शन केले. चर्चासत्र कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार डॉ. ज्ञानेश्वर सुरडकर यांनी केले. प्रक्षेत्र भेटीस विशाल भांदर्गे, विष्णू माने, भरत नरवाडे, संजय रणखांब, शालुबाई रणखांब, विजयकुमार रणखांब, सर्जेराव शिंदे, सिधराम चव्हाण, भरतराम जाधव असे बोरवटी, महापूर, घाटनांदुर व वाकडी इत्यादी गावातील शेतकरी व पशुपालक बहुसंख्येने उपस्थित होते.

ॲड. प्रदिपसिंह गंगणे समाजभूषण पुरस्काराने सन्मानित



लातूर - अखिल भारतीय हिंदु खाटीक समाज संघटनेच्या अकोला शाखेच्या वतीने सोमवार, दि. ०९ डिसेंबर रोजी अकोला येथील राज्यस्तरीय मेळाव्यात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात लातूरचे वकिल तथा सामाजिक कार्यकर्ते ॲड प्रदिपसिंह गंगणे यांना समाजभूषण पुरस्कार जेष्ठ समाजसेवक तथा राष्ट्रीय संरक्षक विश्वनाथ गोतारकर व प्रदेश कार्यवाहक चंदूभाऊ गोतारकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतोष माकोडे तर प्रमुख अतिथी म्हणून हिरामण क्षीरसागर, प्रविण गालिंदे, विश्राम पवार, विजय गालिंदे, बाबुराव हिवराळे, मनोहर हरणे , संजयकुमार साबणे, सतपाल ऐललकर , अमोल खिरडकर , पार्थ गालिंदे आदि व्यासपीठावर उपस्थिती होते.

ॲड.प्रदीप सिंह गंगणे हे लातूर जिल्हा न्यायालयात वकिल असून ते विद्यार्थी दशेपासूनच सामाजिक, शैक्षणिक, बालकल्याण तथा राष्ट्रीय सदभावना आदी क्षेत्रात कार्यरत असुन त्यांनी हिंदू खाटीक समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी आर्थिक विकास महामंडळाच्या मागणीसाठी अनेक आंदोलने करत महायुती सरकारचे लक्ष वेधले होते.

ॲड. प्रदिपसिंह गंगणे यांना त्यांच्या या सामाजिक कार्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते वीर भगतसिंह विद्यार्थी गौरव पुरस्कार, अखिल भारतीय छावा संघटनेचा सामाजिक पुरस्कार, डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार, डॉ. सौ चंद्रकलादेवी पद्मसिंह पाटील पुरस्कार, मुंबई संध्या परिवाराचा सेवादिप पुरस्कार, मुंबई जनगौरव कार्यदर्पण आयकॉन पुरस्कार, डॉ. बाबासाहेब आबेडकर युवा पुरस्कार आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. या पुरस्काराबद्दल मा.मंत्री ना संजय बनसोडे, माजी आ. वैजनाथ शिंदे, ज्येष्ठ विधीज्ञ व्यकटराव बेंद्रे, प्रा. डॉ. बी. व्हीं मोतीपवळे, मकरंद सावे, ताहेरभाई सौदागर, ॲड. सुहास बेंद्रे, जमाल्लोदीन मणियार, बालाजी अप्पा पिंपळे, ॲड. अमितकुमार कोथमिरे, सुनिल कांबळे, डॉ. अंबादास कारेपुरकर, संतोष मस्के, सुरेश थोरात, ॲड. श्रीकांत मोमले, ॲड. अभिजित मगर, सुशिलसिंह चौहाण, आनंद पारसेवार, गणेश सौदागर, सुनिल दुरुगकर, राजु बुये, दिगंबर कांबळे, योगेश डोंगरे, इंद्रजित गंगणे आदींनी अभिनंदन केले आहे.

दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या ऋतुजा जोशीची राष्ट्रीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी निवड



लातूर : दि १२ ते १४ नोव्हेंबर २०२४ रोजी बुलढाणा येथे झालेल्या राज्य स्पर्धेमधून कु. ऋतुजा जोशी या खेळाडूची दि.१३ ते १६ डिसेंबर २०२४ दरम्यान लुधियांना येथे होणाऱ्या राष्ट्रीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तिला पुढील स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्हाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षक डॉ.संध्या वाडीकर,पर्यवेक्षक डॉ. वैशाली पाटील,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,प्रा.व्यंकट कैले,प्रा.विजयकुमार मांदळे, डॉ.हेमंत वरुडकर,प्रा.एम.बी. पाटील,महेंद्र कोराळे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्या दिल्या.या खेळाडूला क्रीडा विभाग प्रमुख डॉ.महेश बेंबडे ,प्रा.निशिकांत सदाफुले,प्रा.विनोद गवरे,अविनाश पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

संगणक परिचारक संघटनेची लातूर तालुका कार्यकारणी जाहीर



लातूर : येथील जिल्हा परिषदेच्या परिसरात मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटनेची बैठक संपन्न होऊन, संघटना मजबूत करण्यासाठी राज्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा संघटनेच्या वतीने लातूर तालुका कार्यकारणी गठित करण्यात आली.

या कार्यकारणीत अध्यक्ष म्हणून शिवाजी नाथबोने, उपाध्यक्ष:- अमर पिंपरे, सचिव विनोद वाघचौरे , कोषाध्यक्ष :- पीरपाशा शेख , तालुका उपाध्यक्ष महिला:- ज्योती जाधव, कार्याध्यक्ष :-दिलीप सुरवसे, तांत्रिक प्रमुख :- ज्ञानेश्वर केंद्र , तालुका संघटक :-अर्जुन कसपटे, व शंकर सुरवसे सोशल मीडिया प्रमुख :-हरी माने व गणेश साळुंके सल्लागार :- हेमंत जोशी, सह सचिव :- भैरवनाथ झाडके, प्रसिद्धी प्रमुख :- अभिलाष वाघचौरे व उमेश भरबडे यांची निवड करून नियुक्त्या देण्यात आल्या.

सावरगाव शिवारात विद्युत मोटारी, केबलची चोरी

मुरूड : लातूर तालुक्यातील सावरगाव परिसरात शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारी व केबल चोरीला जाण्याचे प्रकार वाढले आहेत. चोरट्यांचा धुमाकूळ सुरू झाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावत आहे. येथील शेतकरी महेश विकास माने यांच्या शेतातून मोटार चोरी करण्यात आली आहे. तर इतर तीन शेतकऱ्यांच्या इलेक्ट्रिक मोटारीच्या केबल चोरीला गेल्या आहेत.

महेश माने यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे, शनिवारी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास शेतातील काम उरकून घराकडे गेलो होतो. रविवारी सकाळी ७ वाजता शेतात आल्यावर गट नंबर २१५ मधील विहिरीतील पानबुडी मोटार, २१६ मधील विहिरीवरील दोन मोटारी (किंमत अंदाजे ३० हजार रुपये) चोरीला गेल्याचे दिसून आले. तसेच माने यांच्या शेजारी असलेले शेतकरी लालासाहेब किशनराव शिंदे यांच्या २, सुशीलाबाई

भारत शिंदे यांची १ व संदीपान मोहन शिंदे यांची एक मोटार चोरीला गेली आहे. याअगोदरही निवळी, चाटा गावातील अनेक शेतकऱ्यांच्या मोटारीच्या केबल चोरीला गेल्याच्या घटना घडलेल्या आहेत. या चोऱ्यांमुळे सध्या तरी शेतकरी हतबल झाला असल्याचे चित्र या भागात पाहावयास मिळत आहे. पोलिसांनी चोरांचा तपास लावावा, अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांनी केली आहे.

आलमला बचत गटाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



लातूर : येथील आलमला बचत गट हा सामाजिक उपक्रम राबवून व आर्थिक विकास करत संघटितपणे एकत्र अखंडपणे पुढे जात आहे असे मत माणूस प्रतिष्ठान चे अध्यक्ष व माझं घर सेवा प्रकल्पाचे संचालक मा. श्री शरद झरे यांनी केले. आलमला बचत गटाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या दिनदर्शिका प्रकाशन श्री शरद झरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ते बोलत होते कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आलमला गावचे सरपंच श्री विकास वाघमारे तर प्रमुख पाहुणे म्हणून गावचे उपसरपंच श्री इरफान मुलानी जलतज्ञ श्री राजेंद्र सर व गटाच्या अध्यक्षा सौ. संगीता बेरकीले उपस्थित होत्या. लातूर येथे आयोजित कार्यक्रमात आलमला बचत गटाच्या वतीने वर्ष २०२५ साठी काढलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यातआले. लातूरमध्ये राहणाऱ्या सर्व गावातील तरुण व्यावसायिकांना व महिलांना एकत्र येऊन बचत गटाची स्थापना केली हा उपक्रम स्तुत्य आहे गावच्या एकीचे दर्शन होते यातून एकमेकांच्या गरजही भागतात व सामाजिक व आर्थिक विकास होतो यावेळी बचत गटाच्या दिनदर्शिका व प्रकाशन सोहळ्यासाठी ज्यांनी जाहिरात देऊन सहकार्य केले श्री मोहन समशेट्टे, सोमेश्वर पाटील शिवशरण धाराशिवे डॉ. जयशंकर बेरूळे, विजय कदम, मन्मथ स्वामी, विलास जाधव,डॉ. शरद साबळे ग्रामपंचायत आलमला, शिवाजी खिचडे, एडवोकेट उमाकांत नाईक नवरे व जयशंकर लोहारे यांचाही पुष्पगुच्छ व दिनदर्शिका भेट देऊन सत्कार करण्यात आला या कार्यक्रमास सं. अध्यक्ष शिवकुमार आंबुलगे,अध्यक्ष रविकिरण खिचडे, सदस्य विरणाथ निलंगेकर,संगमेश्वर पाटील , रमाकांत पाटील, राम कापसे, योगेश खिचडे, सुमन बोरुळे, उमा कोरे, सविता घवले, जयनंदा विभुते,आशिष पावले, रोहिदास माने, धोंडीराम निलंगेकर, पार्वती अडसुळे, जयश्री जावळे, महेश गांधले व राहुल हाजगुडे इत्यादी सदस्य उपस्थित होते. सूत्रसंचालन धनाजी गुरव यांनी तर महिपाल ठाकूर यांनी आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

संविधान शिल्पाचा अवमान करणाऱ्यावर कठोर कारवाई करा



लातूर / प्रतिनिधी- परभणी येथील संविधान शिल्पाचा अवमान करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून कठोर कार्यवाही करावी, अशी मागणी लातूरच्या संविधान स्तंभ कृती समितीने केली आहे.

परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरातील संविधान प्रतिकृतीचा अवमान केल्याची घटना घडली आहे. सौहार्दपूर्ण वातावरण बिघडविण्याच्या व सामाजिक वितुष्ट निर्माण करून दंगल घडवून आणण्याच्या केलेल्या उद्देशाने सदर घटना घडविण्यात आली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा नोंद करावा, अशी मागणी संविधान स्तंभ कृती समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवेदन देवून केली आहे. या निवेदनावर संविधान स्तंभ कृती समितीचे अध्यक्ष नवनाथ आल्टे, सचिव संजय सोनकांबळे, सल्लागार लाला सुरवसे, विनय जाकते, डी. उमाकांत, सुनील फुलारी यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जिल्ह्यातील १०० दिवशीय क्षयरोग अभियान व शिबिराचे आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते उद्घाटन



लातूर / प्रतिनिधी- राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात १०० दिवशीय क्षयरोग मोहीम राबविण्यात येत आहे. लातूर जिल्हा क्षयरोग केंद्र व वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालय व हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने आज वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालय व हॉस्पीटल येथे आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते निक्षय वाहनास हिरवा झेंडा दाखवून व क्षयरुग्ण शोध मोहीमेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिपक लांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.तांबारे एस.एन., मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. खामितकर एस.सी., उपप्राचार्य डॉ.अतुल कुलकर्णी उपस्थित होते.

वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालय व हॉस्पीटल येथील विद्यार्थ्यांनी क्षयरोगाची लक्षणे, निदान व उपचार याबाबत पथनाट्य सादर केले. आमदार विक्रम काळे यांनी उपस्थितांना जिल्हा क्षयरोग मुक्त करण्यासाठी गावपातळीवर मोहीम राबवित असताना १०० दिवशीय क्षयरोग मोहीमेअंतर्गत जनजागृती व क्षयरोग रुग्ण शोधण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे अश्वासन दिले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सर्व आरोग्य संस्थेमध्ये गाव पातळीवर क्षयरोग शोध मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी अतिजोखमीच्या व्यक्तीमध्ये, तसेच जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरीकांनी क्षयरोगाबाबतची तपासणी करुन निदान निश्चितीनंतर संपूर्ण उपचार करुन घ्यावे. क्षयरोगाबाबतच्या गैरसमजूती समुपदेशनामार्फत दूर कराव्यात. तसेच औद्योगिक संस्था, दानशुर व्यक्ती तसेच सर्व शासकीय विभाग, शिक्षण, पंचायतराज, समाज कल्याण, लोकप्रतिनिधी, औद्योगिक संस्थांनी मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्यासाठी सूचना केल्या.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बालाजी शिंदे यांनी यावेळी क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमामध्ये क्षयरोग मुक्तीसाठी झालेले निदान व उपचारमधील बदल नमूद केले आहे. तसेच १०० दिवशीय क्षयरोग मोहीमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभागामार्फत जास्तीत जास्त प्रसिध्दी, जनजागृती, संशयितांची तपासणी शिबिरे घेवून जनतेपर्यंत आरोग्य सेवा पोहचाव्यात व जिल्हा क्षयरोग मुक्त करावा, असे अवाहन केले.

या कार्यक्रमाध्ये निक्षय मित्र व टीबी चॅम्पीयन यांचा मान्यवराच्या हस्ते प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. प्रस्ताविक जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. तांबारे एस.एन, यांनी केले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पवार आर.एच., जिल्हा क्षयरोग केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.राऊत एच.के., डॉ.बांगर ए.आर., डॉ.रमेश बगडे, शहर नोडल अधिकारी, जागतिक आरोग्य संघटना सल्लागार डॉ. सम्यक खैरे, जिल्हास्तरीय कर्मचारी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, समूदाय आरोग्य अधिकारी, वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालय व हॉस्पीटल येथील प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी, आशा स्वंयसेविका, व नागरीक यावेळी उपस्थित होते. निक्षय शिबीराअंतर्गत एकूण ८३ नागरीकांची तपसणी करुन ७२ अनुमानितांचे थुंकी नमुने घेण्यात आले. ८२ जणांची एक्स-रे मशीनद्वारे तपासणी करण्यात आली.



भारतीय संविधान मानवी हक्कांचा महासागर आहे : डॉ. भीमराव पाटील

लातूर (प्रतिनिधी)- मानवी हक्क हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत. जगात अनेक चळवळी हक्क प्राप्ती साठीच उभ्या राहिल्या आहेत. भारतातही महात्मा बसवेश्वरापासून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत ज्यांनी ज्यांनी मानवी मूल्यांसाठी संघर्ष केला. त्या सर्व मूल्यांच्या प्रवाहाचे एकत्रीकरण भारतीय संविधानात झाले आहे. म्हणून भारतीय संविधान मानवी हक्कांचा महासागर आहे. असे मत डॉ. भीमराव पाटील यांनी व्यक्त केले.

राजर्षीशाहूमहाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाने १० डिसेंबर जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त 'मानवी हक्क व भारतीय संविधानफ या विषयावर अतिथी व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. भीमराव पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात हक्काचा उदयापासून भारतीय संविधानातील तरतुदीबाबत आपले विचार मांडले व सद्यस्थितीतील समस्यांच्या उपायांबाबत भाष्य केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ओम मोटे यांनी व सूत्रसंचालन कु. जागृती राजनाळे, कु. राजकन्या फावडे यांनी केले. तर आभार प्रदर्शन परमेश्वर पाटील यांनी केले.या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, विशेष कार्यासन अधिकारी डॉ. अभिजित यादव, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा.कृष्णा पांचाळ, प्रा. दीपिका स्वामी, प्रा. ऋतुजा बावचकर, प्रा. सुदर्शन पाटील, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.